महा मेट्रो

NAGPUR METRO

# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड
# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प)

---

## मेट्रोचा जास्तीत जास्ती उपयोग करावा उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे नागपूरकरांना आवाहन

## श्री अजित पवार यांनी केला सिताबर्डी ते खापरी मेट्रो स्टेशन दरम्यान प्रवास



नागपूर दि. १६ : आज राज्याचे मा. उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी सिताबर्डी इतरचेंज ते खापरी मेट्रो स्टेशन पर्यंत नागपूर मेट्रोची सफारी करून प्रवाशांशी संवाद साधला. शहरातील वाहतूक कोंडीची समस्या सोडवण्यासाठी मेट्रोचा जास्तीत जास्त वापर करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी नागपूरकरांना केले.





यावेळी महा मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्री.श्रावण हर्डिकर, संचालक श्री.अनिल कोकाटे व श्री.राजीव त्यागी तसेच इत्तर अधिकारी यावेळी उपस्थित होते. व्यवस्थापकीय संचालक यांनी उपमुख्यमंत्री श्री पवार यांना नागपूर मेट्रो रेल प्रकल्पाबाबत माहिती देत सिताबर्डी इतरचेंज येथील ऍक्का आणि ऑरेंज लाईन येथील मेट्रो ट्रेनचे संचालन व इटरचेंज स्टेशन बाबत माहिती प्रदान केली.

पाहणी दरम्यान उपमुख्यमंत्री यांनी प्रवाशांकडून माहिती जाणून घेत मेट्रो रेल्वेमुळे वेळेची व पैशाची बचत होत असल्याचे सुमित मोरे या परभणी येथून नागपूरात नोकरीनिमित्त स्थायीक झालेल्या प्रवाशाने सांगितले तसेच इतर प्रवाशांनी देखील मेट्रो बाबत समाधानी असल्याचे सांगितल्यावर उपमुख्यमंत्र्यांनी आनंद व्यक्त केला याव्यतिरिक्त स्टेशन परिसरातील व्यवसायिकांशी संवाद साधत त्यांच्या व्यवसायाबद्दल माहिती जाणून घेतली.

- उपमुख्यमंत्री श्री अजित पवार : अधिवेशन सुरु असल्यामुळे मी नागपूर येथे असून आज सिताबर्डी इंटरचेंज ते खापरी मेट्रो स्टेशन पर्यंत असा मेट्रोचा प्रवास केला, माझी नागपूरकरांना आवाहन आहे कि,आपण महाराष्ट्रामध्ये मुबंई,नागपूर,पुणे,पिंपरी-चिंचवड येथे मेट्रोची कामे केली आहे. नागरिकांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला पाहिजे. मी प्रवास करतांना प्रवाश्यांशी बोलो त्यांनी सांगितले कि ते समाधानी आहे,वेळेची बचत होते आहे, रोजचा प्रवास करण्याकरिता विद्यार्थी-विद्यार्थिनी मेट्रोचा प्रवास केला तर रस्त्यावरची कोंडी कमी होण्यास मदत होणार आहे. संपूर्ण कॉरिडोर मध्ये मेट्रो सेवा सुरु होऊन एक वर्ष झाले असून त्यामध्ये बऱ्याच अंशी प्रवाश्याना

माहिती होण्याच्या दृष्टीने महा मेट्रोने कार्य केले आहे. माझे नागरिकांना व नागपूरकरांना आवाहन आहे कि, राज्य सरकार व केंद्र सरकार मिळून मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करते हे नागरिकांना सुविधा देण्याच्या दृष्टीने करत असते अजून हि पुढे बुटीबोरी पर्यंत जाण्याचा मानस आहे त्याच्यामध्ये एयरपोर्ट असून त्यांना-जाण्या येण्याच्या दृष्टिकोनातून काही व्यवस्था करण्याचे महा मेट्रोने ठरविले आहे असे मत उपमुख्यमंत्री श्री.अजित पवार यांनी व्यक्त केले. उल्लेखनीय आहे कि नागपूर मेट्रोची प्रवासी सेवा सुरु झाल्यापासून देशाचे मा. प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री श्री. नितीन गडकरी, राज्याचे उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी नागपूर्ण मेट्रोने प्रवास केला आहे.